# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०४/२०२५ (रविवार)**

---

### अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ४ गुन्हे नोंद एकुण १ कोटी २५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त उपविभागिय पोलीस अधिकारी , कन्हान आणि पोलीस स्टेशन कन्हान यांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान**:— दिनांक १९/०४/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दर ,पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रमीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधिकारी कन्हान आणि कन्हान पोलीस यांनी गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त करीत, मन्सर कडून कन्हानकडे येणाऱ्या मार्गावर अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्यांवर जुने पोलीस स्टेशन , कन्हान समोर नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं १.** नमुद पथकाला नाकाबंदी दरम्यान ००:१४ वाजता ट्रक क्र. एम.एच.४०.सिटी. ७७१७ हा मन्सर कडून कन्हान कडे येतांना दिसला त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे अक्षय रतेन्द्रकुमार नागेश्वर वय २९ वर्षे, कौशल्यानगर, पीली नदी, कामठी रोड हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता सय्यद फईम सय्यद साबीर,रा कामठी,अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ७ ब्रास रेती किंमती ३५,००० /— रूपये आणि २)** ट्रक क्र. एम.एच. ४०.सिटी.७७१७ **किंमती २५,००,०००/— रूपये असा एकुण २५,३५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २.** नमुद पथकाला नाकाबंदी दरम्यान ००:४० वाजता ट्रक क्र एम.एच ३६ ए.ए. ४०६१ हा मन्सर कडून कन्हान कडे येंताना दिसला त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . **वाहन चालक आरोपी नामे नितीन अशोक नेवारे वय २७ वर्ष रा. डोडमाझरी, आमगाव दीघोरी ता. जि. भंडारा हा मिळुन**

**आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक मोरेश्वर सहादेव भीवगडे, वय ३० वर्ष रा. कुशारी ता. मोहाडी जि. भंडारा अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) **६ ब्रास रेती किंमती ३०,००० /— रूपये आणि २)** ट्रक क्र एम.एच ३६ ए.ए.४०६१**किंमती २५,००,०००/— रूपये आणि असा एकुण २५,३०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ३.** नमुद पथकाला नाकाबंदी दरम्यान ०१:१० वाजता एम.एच ४० बी.एफ ८१९१ हा मिळुन आला. त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . **वाहन चालक आरोपी नामे आकाश सुनील कनोजे वय ३० वर्ष रा. रवीदास नगर, येरखेडा, कामठी हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक इंद्रजीत दयाराम वहील्ले, रा. अजनी, गादा ता. कामठी जि. नागपूर. अशी** माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ७ ब्रास रेती किंमती ३५,००० /— रूपये आणि २) एम.एच ४० बी.एफ ८१९१ **किंमती २५,००,०००/— रूपये असा एकुण २५,३५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ४.** नमुद पथकाला नाकाबंदी दरम्यान ०१:३१ वाजता ट्रक क्र. एम.एच ३६ ए.ए १५१८ हा मिळुन आला. त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये रेती आढळुन आली . **वाहन चालक आरोपी नामे सुरेन्द्र योगेश्वर ठाकरे वय २५ वर्ष रा. खैरलांजी ता. तुमसर जि. भंडारा हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक गंगाधर दामाजी राउत, रा. डोंगरला ता. तुमसर जि. भंडारा अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन** १) ५ ब्रास रेती किंमती २५,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र. एम.एच ३६ ए.ए १५१८ किंमती २४,००,०००/— रूपये आणि ३) ॲड्रॉईड मोबाईल फोन किंमती १५,००० /— रूपये **असा एकुण २४,२५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर कारवाईत एकुण १ कोटी २५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व**

**खनीजे अधिनीयम,१९५७ अन्वये ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. नमुद ४ चालक आरोपीतांना अटक करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन भिवापुर** :– दिनांक १९/०४/२०२५ रोजी भिवापुर पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **पोलीस स्टेशन टी पॉईंट** येथे नाकाबंदी केली असता पोलीसांना **ट्रक क्रमांक एम.एच. ४० सी.एम. ८७६० मिळुन आला.** वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे नितेश प्राण गोंडाने, वय २८ वर्षे, रा. सिध्दार्थनगर ,भिवापुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक अमोल करंजेकर रा. पवनी जि. भंडारा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१) ८ ब्रास रेती आणि २) ट्रक क्रमांक एम.एच.४० सी.एम ८७६० असा एकुण ३०,४०,०००/– रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद वाहन चालक आणि मालक आरोपी याच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम ,कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **नमुद वाहन चालकाला पोलीसांनी अटक केली आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन आरोली** :– दिनांक १९/०४/२०२५ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **महिन्द्रा बोलेरो पिकअप गाडी क्र. एम.एच.४९ बी.झेड ४४४९** मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नाकाबंदी केली असता चोखाळा फाटा येथे संशयीत वाहन महिन्द्रा बोलेरो

पिकअप गाडी क्र. एम.एच.४९ बी.झेड ४४४१ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये **२ म्हशी व २ हेंले तोंडाला दोरीने बांधुन** निर्दयते कोंबुन असलेले मिळुन आले. .तसेच चालक प्रितम हरिचंद्र दिवटे वय २५ वर्षे रा. सरदार नगर, तुमसर आणि त्याचा साथीदार क्लिनर नामे अरविंद दादुजी भोयर, वय २३ वर्षे, रा. हसारा नगर, रोड तुमसर हे मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन **एक महिन्द्रा बोलेरो पिकअप गाडी क्र. एम.एच.४९ बी.झेड ४४४१ किंमती ४,००,०००/— रूपये. आणि २ म्हशी व २ हेंले प्रत्येकी कि. २८,०००/—रुपये प्रमाणे किंमती १,१२,०००/ रूपये एकुण किंमती ५,१२,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद दोन्ही आरोपीतांच्या विरूध्द कलम २८१,१२५,३(५), बी.एन.एस.२०२३ ११(१)डी प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधि.१९६०,अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड:—** दिनांक १९/०४/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, मौजा गरडेपार येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीसांनी **मौजा गरडेपार** येथे मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या महीला आरोपीवर कारवाई केली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्या महीला आरोपीच्या ताब्यात १) ५० लिटर मोहाफुल दारू किंमती ५०००/— रूपये, २) ५४० किलो सडवा किंमती १८,९००/— रूपये इतर साहीत्यासह एकुण किंमती **३९,९५० /— रूपयांचा मुद्देमाल** मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने